# आनंदाची अनुभूती



स्वाती भट

**मुंबई :** आनंदाचा शोध घेण्याचा एका मुलीचा प्रवास दाखविणारे 'एल दोरॅडो' हे अनोखे संगीतनाट्य रंगभूमीवर आले आहे. ओडिसी नृत्यप्रकाराच्या माध्यमातून ही कथा प्रेक्षकांसमोर उलगडत जाते. देशात विविध ठिकाणी या नाटकाचे काही प्रयोग झाले असून, येत्या ११ फेब्रुवारीला अंधेरीतील मुक्ती फाउंडेशन थिएटरमध्ये याचा प्रयोग रंगणार आहे.

'एल दोरॅडो' म्हणजे आनंदाचा खजिना. हेच प्रतीक वापरून या नाटकाला हे नाव देण्यात आले आहे. अनिता कुलकर्णी यांच्या कल्पनेतून घडलेले हे सांगीतिक नाट्य आहे. एका मुलीच्या आईने मृत्युशय्येवर असताना केलेल्या उपदेशाप्रमाणे ती तिच्या आनंदाच्या सोन्याचा शोध घेते. तिची ही शोधयात्रा 'एल दोरॅडो'तून प्रेक्षकांना बघायला मिळते. मनोरंजन होण्याबरोबरच एक आध्यात्मिक संदेशही यात प्रेक्षकांना मिळतो.

ओडिसी नृत्याविष्कारांतून ही कथा सादर होत जाते. यातील संगीत हे स्वतः अनिता कुलकर्णी यांचे असून दक्षा मशरुवाला या सुप्रसिद्ध ओडिसी नृत्यांगना यांची कोरिओग्राफी आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ६ जणांच्या टीमने हे सादरीकरण केले आहे. रेणू फोरम फॉर आर्टस् आणि कौशिकी नृत्यभाषा या दोन संस्थांनी एकत्रितपणे हे नाटक बांधले आहे. रवींद्रनाथ टागोर यांच्या कविता, कबीराचे दोहे आणि अनिता कुलकर्णी यांच्या काही स्वरचित कविता घेऊन हे सांगीतिक नृत्यनाट्य गुंफण्यात आले आहे.

नाटकाच्या नेपथ्यावर विशेष काम करण्यात आले आहे. अनिता कुलकर्णी यांनी स्वतः कथेला साजेशी चित्रे काढली असून ती बॅकड्रॉपमध्ये वापरण्यात आली आहेत. कथा, संगीत, चित्रे, नृत्य यांचा एकत्रित अनुभव घेत शेवटच्या प्रसंगात असलेल्या दारवेशी व्हर्ल्स आणि सुफी संगीताचा संगम यामध्ये प्रेक्षक आनंदाची अनुभूती घेतो.

**“ सगळ्या कला या एकमेकांत गुंतलेल्या असतात. आपल्याला तर अतिशय उत्तम असा कला वारसा लाभला आहे. 'एल दोरॅडो'चे प्रयोग जगभर करण्याची इच्छा आहे.**

– अनिता कुलकर्णी, संस्थापिका, रेणू फोरम आर्ट्स

